**मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात, नवी मुंबई अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत.**

---------------

मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात,नवी मुंबई अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

या बैठकीत म.औ.वि.म., वाहतूक नियंत्रण विभाग, न.मु.म.पा. या विभागाचे अधिकारी तसेच टी.टी.सी., एम.आय.डी.सी. परिसरातील उदयोगांचे प्रतिनिधी हजर होते.

डॉ.श्री. वि. मो. मोटघरे सहसंचालक (ह.प्र.नि.) यांनी उपस्थितांचे आभार मानले तसेच श्री. राजू वसावे, उप-प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई-२ यांनी मागील बैठकीमधील मसूदयाची प्रस्तावना केली. तसेच प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई यांनी पर्यावरण प्रदूषण निर्देशांकाच्या अनूषंगाने तयार केलेल्या कृती आराखाडा व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती सांगितली व सदर निर्देशंक २००९ मध्ये ७३-७७ इतका होता. तो २०१७ मध्ये ५६.४८ इतका कमी झाल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच बैठकीमध्ये खालील मुददयांवर सविस्तार चर्चा झाली.

| अ. क्र. | मुद्दा | **बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे** | **संबंधित विभाग** |
|---|---|---|---|
| १ | म.औ.वि. परिसरातील औदयोगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईन व चेंबरचे दुरुस्ती बाबत. | म.औ.वि.म. प्रतिनिधींनी, टी.टी.सी. एमआयडीसी मधील २१ किमीची जुनी पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकण्याची निविदा दिली असून ती अंतिम मंजुरीच्या टप्प्यावर आहे. या कामासाठी १८ महिन्यांचा कालावधी लागेल व सदर काम पावसाळयानंतर सुरु होणार असल्याचे सांगितले. तसेच औदयोगिक परिसरातील "सी" व "डी" विभागातील औदयोगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईन व चेंबरचे सर्वेक्षण उप-प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी म.औ.वि.महामंडळाच्या अधिका-यांसोबत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने नादुरुस्त पाईपलाईन | म.औ.वि.महामंडळ/म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व चेंबर दुरुस्तीचे काम म.औ.वि.महामंडळाच्या अधिका-यांना तात्काळ करण्यात सांगितले आहे व त्याबाबतचा अहवाल त्वरीत सादर करण्यात यावा. | |
| २ | टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्ते दुरुस्ती बाबत. | टीटीसी औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे काम पुर्ण झाल्याचे नवी मुंबई महानगरपालिका प्रतिनीधींनी सांगितले. | महानगरपालिका |
| ३ | LDAR व VOC Analyser यंत्रणा उभारणीबाबत. | निर्देशित केलेल्या एकुण १६ उदयोगापैकी १३ उदयोगांनी सदर यंत्रणा बसविलेली असून १ उदयोग बंद आहे व १ उदयोगाने उत्पादन प्रक्रिया बदलली आहे. सदर यंत्रणा न बसविलेल्या उर्वरीत उदयोगास प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे सुचित करण्यात आले व त्याबाबत बँकहमी घेण्यात यावी. | उद्योग/म.प्र.नि.मंडळ |
| ४ | आरोग्यावर होणाऱ्या परिणामाबाबतचा अहवाल | सदर अहवाल नवी मुंबई महानगरपालिकेने १ महिन्यातसादर करण्याबाबत सुचविले. | महानगरपालिका |
| ५ | सामुहिक सांडपाणी संयंत्रणेमधील सुधारणा | टी.टी.सी. सामुहिक सांडपाणी संयंत्रणा यांनी सादर केलेल्या कार्यक्षमता मुल्यांकन अहवालाचे (Performance Evaluation Study Report) सह-संचालक (ज.प्र.नि), प्रादेशिक अधिकारी व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI) यांनी मुल्यांकन करण्याबाबत सुचित करण्यात आले. उप-प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी याबाबत सदर समितीपुढे अहवाल सादर करुन, मुल्यांकन करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याचे सांगितले.<br><br>तसेच, सि.ई.टी.पी. प्रतिनिधीनी 100 घन मीटर / दिन क्षमतेची आर. ऑ. सयंत्रणा उभारण्याचे काम पुर्ण झाल्याचे सांगितले. सदर आर ओ प्राक्रियाकृत सांडपाणी खडी मशीन उदयोगांना हवा प्रदुषण नियंत्रणासाठी | म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्याबाबत चर्चा झाली. या अनुषंगाने प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि. मंडळ,नवी मुंबई यांना सी.ई.टी.पी व खडी मशीन उदयोग यांची संयुक्त बैठक घेण्याबाबत सुचविण्यात आले. | |
| ६ | कोळश्यावर आधारित वस्त्र उद्योगांनी पर्यावरण पुरक इंधनाचा वापर करणेबाबत. | कोळश्यावर आधारित वस्त्र उद्योगांना पर्यावरण पुरक इंधन (PNG) चा वापर करणेबाबत आदेश देण्याचे व त्यासाठी एक वर्षाचा कार्यकाल निश्चित करुन किंवा वस्त्र उद्योगांनी केलेल्या कामाचा दरमाह अहवाल उप-प्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांच्यामार्फत सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले. | वस्त्र उद्योग/म.प्र.नि.मंडळ |
| ७ | म.औ.वि. परिसरातील झोपडपट्टयामधुन निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्याच्या विल्हेवाटीबाबत. | सदर काम पुर्ण झाल्याचे नवी मुंबई महानगरपालिका प्रतिनीधींनी सांगितले. | महानगरपालिका |
| ८ | उदयोगांनी SCADA यंत्रणा उभारणेबाबत. | निर्देशित केलेल्या उदयोगांपैकी १५ उदयोगांनी सदर यंत्रणा बसविलेली असून उर्वरित उदयोगांना प्रादेशिक अधिकारी यांनी SCADA यंत्रणा बसविण्याचे निर्देश देण्याचे सुचविण्यात आले व १ महिन्यांतर त्याबाबत उप-प्रादेशिक अधिकारी,नवी मुंबई यांनी अंमलबजावणीबाबत उद्योगांना भेटी देऊन SCADA यंत्रणा न बसविलेल्या उद्योगांवर पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | उद्योग/म.प्र.नि.मंडळ |
| ९ | दगडखाण व खडी मशीन उद्योगामधून होणारे हवेचे प्रदुषण | सद्य:स्थितीत सर्व खडी मशीन व दगड खाण उद्योग बंद आहेत, असे सांगण्यात आले. उप-प्रादेशिक अधिकारी,नवी मुंबई यांनी खडी मशिन व दगडखाणी उद्योग पुन्हा सुरु करण्या अगोदर त्यांचे उत्खन्न परवाना नूतनीकरण व प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेबाबत तपासणी करावी. | म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | वाहनांपासून होणाऱ्या प्रदुषणाबाबत. | नवी मुंबई महानगरपालिकेअंतर्गत असणाऱ्या सर्व पब्लिक ट्रान्सपोर्ट वाहनांना सहा महिन्याच्या कालावधीमध्ये पर्यावरण पुरक इंधन (सीएनजी/ पीएनजी) वापर करणे व १५ वर्षावरिल जुन्या वाहनांना वापरास बंदी घालणेबाबत आयुक्तांना म.प्र.नि. मंडळ मुख्यालय स्तरावरुन निर्देश देण्याबाबत सुचविण्यात आले. | महानगरपालिका/परिवहन प्रादेशिक विभाग/म.प्र.नि.मंडळ |
| ११ | वृक्षारोपण | वृक्षारोपन कार्यक्रमाअंतर्गत प्रादेशिक कार्यालय नवी मुंबई यांना १.५ लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले. | म.प्र.नि.मंडळ |

वरिल मुददयांच्या चर्चेनंतर मा. सदस्य सचिव यांनी बैठकीमधील सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

**सह संचालक(हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई